**प्रेसनोट** **दिनांकः- २२/०८/२०१९.**

## विश्रामबाग पोलीस स्टेशन,पुणेशहर.

## विनयभंगाच्या गुन्हयातील पाहीजे असलेला आरोपी पोलीसांकडुन जेरबंद.

दिनांक-३१/०७/२०१९ रोजी रात्रौ २१-०० वाजताचे सुमारांस तक्रारदार महिला या तुळशीबाग रस्त्याकडुन मंडईकडे जात असतांना त्यांचे ओळखीचा इसम नामे पवन नंदकिशोर टावरी, वय २६ वर्ष, रा. शुक्रवार पेठ पुणे याने फिर्यादी जवळ येवून फिर्यादीचा रस्ता अडवून त्यांना तु माझा फोन का उचलत नाहीस. तुला शॉपींग करायला पैसे आहेत पण मला खर्चासाठी २०००/- रु. उसणे देत नाहीस असे म्हणुन फिर्यादीच्या डावे कानशिलात हाताने चापट मारुन त्यांचा पाठलाग करुन मागुन येवून फिर्यादीचे इच्छेविरुध्द त्यांचा हात पकडुन बोटाचा चावा घेवून विनयभंग केलेबाबत विश्रामबाग पोलीस ठाणे,पुणेशहर येथे गुन्हा नोंद क्रमांक- २८०/२०१९, भा.दं.वि.सं.कलम ३५४(ड), ३४१, ३२३ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यांत आलेला होता.

माननीय पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१, व सहाय्यक पोलीस आयुक्त, विश्रामबाग विभाग,पुणेशहर यांचे मार्गदर्शनाखाली सदर गुन्हयाचा तपास चालु असतांना व सदर गुन्हयातील वरनमुद आरोपी पवन नंदकिशोर टावरी हा आपले अस्तीत्व लपवून वावरत असतांना तो भाऊ महाराज बोळ येथे आला असलेबाबत तपास पथकातील पोलीस शिपाई चेतन शिरोळकर यांना माहिती मिळाल्याने त्याआधारे विश्रामबाग पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.दादासाहेब चुडाप्पा यांचे अधिपत्याखाली तपास पथकातील पोलीस उप निरीक्षक श्री विजय जाधव, पोलीस हवालदार शरद वाकसे, पोलीस शिपाई चेतन शिरोळकर, पोलीस शिपाई राहुल पवार, यांनी वरनमुद गुन्हयांतील पाहीजे आरोपी पवन नंदकिशोर टावरी, वय २६ वर्ष, रा. शुक्रवार पेठ पुणे यांस दिनांक-२१/०८/२०१९ रोजी २२.३० वा. सापळा रचुन ताब्यांत घेवुन वरनमुद गुन्हा उघडकींस आणुन उल्लेखनिय कामगिरी केलेली आहे.

( दादासाहेब चुडाप्पा )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
विश्रामबाग पोलीस ठाणे,पुणे शहर